**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १७/०६/२०२६ (बुधवार )**

---

## ४१०.८ किलो प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखुसह वाहन असा एकुण ११ लाख ४३ हजार ५० रूपयांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अटक उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड**:— दिनांक १७/०६/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गोपनिय माहिती मिळाली की, **आरोपी श्रीकांत रमेश झाडे याचे मालकीचे** ठोंबरा गावातील शेतातील धुऱ्याजवळ एक वाहन उभे असुन त्यात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु भरलेला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीसांनी तात्काळ सदर ठिकाणी जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता महींद्रा टि यु व्ही वाहन क्र एम. एच. ४७ क्यु. ००९४ हे मिळुन आले. पोलीसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. नमुद वाहनाचा चालक/मालक आरोपी नामे **श्रीकांत रमेश झाडे, वय २४,वर्ष, रा. कावरा पेठ, उमरेड, तहसील उमरेड, जि. नागपूर हा सुध्दा मिळुन आला.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष ४१०. ८ किलोग्रॅम प्रतिबंघीत सुगंधीत तंबाखु साठा किंमती २,४३,०५० /— रूपये आणि महींद्रा टि यु व्ही वाहन क्र एम एच ४७ क्यु ००९४ किंमती ९,००,०००/— रूपये असा एकुण ११,४३,०५०/— रूपयांचा मुद्देमाल केला आहे. नमुद आरोपी हा सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा करून वाहतुक करण्याच्या तयारीत होता. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे उमरेड येथे**

भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २२३,२७४, २७५ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास उमरेड पोलीस करीत आहेत.



# खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील २ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्रीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी १) मिलींद अरविंद धार्मिक, वय २९ वर्ष, रा. नविन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपूर आणि २) महिला आरोपी यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे **आरोपी १) मिलींद अरविंद धार्मिक, वय २९ वर्ष, रा. नविन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपूर आणि २) विणा ज्ञानेश्वर बोरकर, वय ५६ वर्षे, रा. माताखेडी, खापा ता. सावनेर, जि. नागपुर** या दोन्ही आरोपींवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद दोन्ही आरोपी यांना १ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.


हद्‌दपार आरोपी मिलींद अरविंद धार्मिक

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०३ लाख २८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** :— दिनांक १६/०६/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग कार्यालय येथील पथक पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील स्टाफसह पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बुटीबोरी बाजाराकडुन संविधान चौक बोथली कडे जाणारे रोडवर अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी बुटीबोरी बाजाराकडुन संविधान चौक बोथली कडे जाणारे रोडवर नाकाबंदी केली असता संशयित ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३६/एल ३०९७ व विना क्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती (गौणखनिज) आढळुन आली. वाहन चालक **अक्षय रघुनाथ अलोने, वय ३० वर्ष, रा. टाकळी दरणे पो.स्ट गिरोली, ता. देवळी, जि. वर्धा ह. मु. प्रदीप शेंडे यांचे घरी किरायाने प्रभाग ०३, बुटीबोरी ता. जि. नागपुर** हा मिळुन आला. आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक नामे **शाहीद अंन्सारी, रा. बुटीबोरी अशी माहिती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३६/एल ३०९७ किंमती २,००,०००/— रूपये आणि विना क्रमांकाची ट्रॉली किंमती १,२०,०००/—रूपये, ०१ ब्रास रेती किंमती ८,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,२८,०००/—रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या. सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खानी आणि नियमन अधिनियम १९५७, ३ सार्वजनिक मालमत्ता दस्तऐवज अधिनियम, १५ पर्यावरण अधिनियम १९८६ अन्वये, सहकलम ३(१)/१७७ १३०/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, १३ हजार ६०० रूपयांचा मुद्द्देमाल जप्त, पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक १७/०६/२०२६ रोजी पारशिवनी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा तामसवाडी गावातील वार्ड क्र. ३ मध्ये राहणारा नागसेन गुरूदेव चव्हान हा आपले राहते घरी अवैधरीत्या देशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या आरोपी नागसेन गुरूदेव चव्हान, वय ५९ वर्ष, रा. इंदीरानगर तामसवाडी, ता. पारशिवनी याला ताब्यात घेवुन आरोपीचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता एका बंद खोलीत प्लास्टीकचे बोरीमध्ये नमुद आरोपीचे ताब्यात देशी दारू मिळुन आली. पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) देशी दारूच्या ३४० निपा किंमती १३,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस पंचासमक्ष दारू बाळगण्याबाबत परवाना विचारले असता परवाना नसल्याचे सांगीतले. नमुद आरोपीस विक्री करणेकरीता माल पुरविणारा रजत सुर्यवंशी, रा. खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर हा माल आणुन देतो अशी माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या ३४० निपा किंमती १३,६००/—रूपये असा एकुण किंमती १३,६००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी यांचेविरूध्द**

**पोलीस स्टेशन पारशिवनी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक १६/०६/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या दारूची वाहतुक केली जात आहे**. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा मांगली गोसाई शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान होन्डा शाईन दुचाकी क्र. एम.एच ४ बी.एम.

९८३३ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. आरोपी **एकनाथ गुलाब पुरी वय ४५ रा. वार्ड क्र. ०४ तारसा ता. मौदा** हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष होन्डा शाईन दुचाकी क्र. एम.एच ४ बी.एम.९८३३ किंमती ४०,०००/— रूपये आणि १) देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या ७५० सिलबंद निपा २) देशी दारू प्रिमीयम नं. १ च्या ३०० सिलबंद निपा एकुण किंमती ४२,००० /— रूपये असा एकुण ८२,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक १५/०६/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या दारूची वाहतुक केली जात आहे**. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा पाटणसांवगी ते इटनगो कडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बजाज पल्सर दुचाकी एम एच ४० बी डब्लु ९९२९ ही दुचाकी मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी अतुल अशोक तिवारी, वय २९ वर्ष ,रा. वार्ड न ०३ कांद्री बस स्टॉप समोर,कांद्री कन्हान** हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष होन्डा शाईन दुचाकी क्र. बजाज पल्सर दुचाकी एम एच ४० बी डब्लु ९९२९ किंमती ५०,०००/— रूपये आणि १) देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या ६९ सिलबंद निपा किंमती ५,५२०/— रूपये असा एकुण ५५,५२०/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक १६/०६/२०२६ रोजी बेला पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने एक इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा सोनेगाव लोधी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पल्सर मोटरसायकल क्र. एम एच ३२/ ए पी —८९०२ ने सोनेगाव लोधीकडुन जामकडे जातानी मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता प्लास्टीक पिशवीमध्ये देशी दारू च्या २५ निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे सुरज भारतजी शंभरकर, वय ३६ वर्ष, रा. जाम वार्ड क्र.**

**०२, न्युटे ले आउट, ता. समुद्रपुर, जि. वर्धा हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २५ निपा किंमती २०००/—रूपये आणि पल्सर मोटरसायकल क्र. एम एच ३२/ ए पी —८९०२ किंमती ५०,०००/—रू असा एकुण किंमती ५२,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी सुरज भारतजी शंभरकर, वय ३६ वर्ष, रा. जाम वार्ड क्र. ०२, न्युटे ले आउट, ता. समुद्रपुर, जि. वर्धा याचेविरूध्द पोलीस स्टेशन बेला येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १६/०६/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा कांद्री वस्ती येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे रामटेक पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) किशोर जियालाल चंदनबटवे, वय ४० वर्ष, २) किशोर रामनाथ दुधबर्वे, वय ४८ वर्ष, ३) मुन्नीलाल हन्शु बर्वे, वय ७० वर्ष, ४) बुद्द गेंदलाल चंदनबटवे, वय ४० वर्ष, ५) कबीरदास श्यामजी ताकोत, वय ४६ वर्ष, ६) विशाल मेहतर रहेकवार, वय ४२ वर्ष, ७) बबन श्यामा चंदनबटवे, वय ६५ वर्ष** यांना जागीच पकडले.

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ७५०/—रूपये असा एकुण ७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात **आला आहे.नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री,वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १७ गुन्हे नोंद

**दिनांक १६/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री, वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, वाहन असा एकुण २,०६,२१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे संकेत जयपाल कोसरे, वय ३० वर्ष, रा. भोवरी, ता. कामठी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा येथे** आरोपी नामे एकनाथ गुलाब पुरी, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ४, तारसा ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपी** अतुल अशोक तिवारी, वय २९ वर्ष, कांद्री कन्हान, वार्ड नं. ०३, कांद्री बस स्टॉप समोर ह. मु. फॅक्टरी गांधी कॉलनी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपी** १) धिरज हरीभाऊ गजभिये, वय २३ वर्ष, रा. खरसोली, ता. नरखेड, जि. नागपूर २) ०२ **महिला आरोपी** यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी राजेश भरत बोंदरे, वय ४४ वर्ष, रा. धोतीवाडा याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी १)** लोकेश हेंमत सोनकुसरे, वय २० वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड २) ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन अरोली येथे** आरोपी गुणवंता रामचंद्र भाजीपाले, वय ४५ वर्ष, रा. खरडा, ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे** आरोपी १) अर्जुन तेजराम मसराम, वय ४८ वर्ष, रा. गुगुलडोह ता. रामटेक २) उमेश राधेशाम कुंभरे, वय ४२ वर्ष, रा. **महाराजपूर ता. रामटेक** यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी येथे** आरोपी रंजित पुसिया उरमाले, वय ३० वर्ष, रा. शिवटेकडी पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी येथे** आरोपी प्रदुम भोला सुर्यवंशी, वय ५२ वर्ष, रा. सातगाव जयपूर, ता. हिंगणा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला येथे** आरोपी सुरज भारतजी शंभरकर, वय ३६ वर्ष, रा. जाम वार्ड नं. २, न्युटे लेआउट, ता. समुद्रपुर, जि. वर्धा याचेवर १ गुन्हा नोंद

नमुद कारवाईत एकुण १३२८४० मिली देशी दारू, ६८ लिटर मोहाफुल दारू, वाहन असा एकुण २,०६,२१५/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने